TheHitavada
Vidarbha Line | 2025-04-19 | Page- 8

# Go for higher education, prove mettle, students advised

## 6th convocation ceremony held at Smt Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya

**Our Correspondent**
PUSAD, Apr 18

"GETTING a degree at the University convocation ceremony is an unforgettable moment in college life. However, one should not stop there and embrace the sky in various fields with the power of higher education. Students should make most of the opportunity that they get and take higher education and prove their mettle," said Principal of Janata Shikshan Prasarak Mandal and former mayor Dr Madhavi Gulhane,

She was addressing the convocation ceremony of Sant Gadge Baba Amravati University held at Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya.

The students were presented their degree certificates. The function organised by the Students' Council was presided over by the college's executive Principal Rajni Bhoyar. The coordinator of the Students' Council, Prof Dr Swapna Deshmukh, was present on the dais.

At the outset, floral tributes were paid to the statues of Karmayogi Sant Gadge Baba and Vatsalabai Naik. The graduation ceremony was inaugurated by Dr Madhavi Gulhane by lighting the lamp.

Speaking further, Dr Gulhane said that the graduation ceremony was an unforgettable moment in the life of students, a moment which one remembers for life. "The fact that you were awarded degrees at my hands is also an unforgettable moment for me," she said.

Further telling students to dream big, Dr Gulhane stressed that after getting a degree, many roads open for higher education. Along with hard skills, soft skills are also important for a career. All of them can be acquired through the activities implemented in the college, she reminded students asking them to bring fame to this nation, society and college through higher education.

Executive Principal Dr Rajni Bhoyar, while guiding students, said that the last and best moment of college life is the graduation ceremony. This is the 6th convocation ceremony being held in the college.

Guiding students to take a huge leap in their lives, achieve fame, she asked them to live with self-respect, have a positive attitude and optimistism.

The programme was coordinated by the Head of the Sanskrit Department Prof Dr Vaishali Pandey. On this occasion, the University song was presented by Prof Akash Tavide. Prof Dr Madhavi Gulhane was introduced by the coordinator of the students' body Prof Dr Swapna Deshmukh. Prof Varsha Garule proposed a vote of thanks. On this occasion, Executive Principal of the College administered oath to the students. The programme concluded withnational anthem.












सकाळ

# विद्यार्थिनींनी उच्च शिक्षण घेऊन कर्तृत्व सिद्ध करावे

## माजी नगराध्यक्ष डॉ. माधवी गुल्हाने : नाईक महिला महाविद्यालयात दीक्षांत समारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

पुसद, ता. १६ : उच्च शिक्षणाच्या बळावर विविध क्षेत्रातील आभाळ कवेत घेतले पाहिजे. विद्यार्थिनींनी उच्च शिक्षण घेऊन आपले कर्तृत्व सिद्ध करावे, असे विचार माजी नगराध्यक्ष व जनता शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधवी गुल्हाने यांनी व्यक्त केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा पदवीदान सोहळा वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात पार पडला. पुसदच्या माजी नगराध्यक्ष, जनता शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधवी गुल्हाने यांच्या हस्ते विद्यार्थिनींना पदवी प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यार्थिनी मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी प्राचार्य रजनी भोयर होत्या. विद्यार्थिनी मंडळाच्या समन्वयक प्रा. डॉ. स्वप्ना देशमुख उपस्थित होत्या. पदवीदान सोहळ्याचे उद्घाटन डॉ. माधवी गुल्हाने यांच्या हस्ते करण्यात आले.

**पुसद** : गुणवंत विद्यार्थिनींना पदवी प्रमाणपत्र देताना डॉ. माधवी गुल्हाने. सोबत कार्यकारी प्राचार्य डॉ. रजनी भोयर.

यावेळी डॉ. माधवी गुल्हाने म्हणाल्या की, पदवी घेतल्यानंतर उच्च शिक्षणासाठी अनेक मार्ग मोकळे आहेत. करिअरसाठी हार्ड स्किलसोबत सॉफ्ट स्किल महत्त्वाचे ठरतात. ते सर्व महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमातून आत्मसात करता येतात. विद्यार्थिनींनी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून या राष्ट्र, समाज व महाविद्यालयाचा नावलौकिक करावा. कार्यकारी प्राचार्य डॉ. रजनी भोयर म्हणाल्या, महाविद्यालयामध्ये हा सहावा दीक्षांत समारंभ होत आहे. विद्यार्थिनींनो आयुष्यामध्ये उत्तुंग भरारी घ्या, नावलौकिक मिळवा. स्वाभिमानी जगा सकारात्मक भावना ठेवा व आशावादी रहा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृत विभाग प्रमुख प्रा. डॉ. वैशाली पांडे यांनी केले. याप्रसंगी विद्यापीठ गीत प्रा. आकाश ताविडे यांनी सादर केले. प्रा. डॉ. माधवी गुल्हाने यांचा परिचय विद्यार्थिनी मंडळाच्या समन्वयक प्रा. डॉ. स्वप्ना देशमुख यांनी करून दिला. प्रा. वर्षा गारूळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी विद्यार्थिनी मंडळाच्या समन्वयक प्रा. डॉ. स्वप्ना देशमुख, प्रा. विक्रांत मेश्राम, प्रा. डॉ. अमित सूरजुशे, प्रा. वर्षा गारूळे, प्रा. आशालता बरडे, प्रा. पल्लवी राठोड यांनी पुढाकार घेतला.

Nagpur, Yavatmal-Today
17/04/2025 Page No. 3